मराठवाडा व इस्लाम धर्म

प्रा.डॉ.सय्यद मुजीब मुसा
इतिहास विभागप्रमुख,
कला महाविद्यालय, बिडकीन, ता. पैठण,
जि. औरंगाबाद.

प्रस्तावना :

आधुनिक काळात मराठवाडा हा महाराष्ट्र राज्याचा एक प्रशासकीय विभाग आहे. या विभागात औरंगाबाद, बीड, जालना, उस्मानाबाद, परभणी, हिंगोली, लातूर, नांदेड हे आठ जिल्हे समाविष्ट आहेत.

प्राचीन काळापासुन भारताचा अरब राष्ट्रांशी व्यापारी संबंध आहे. इस्लामच्या उदयापूर्वीच भारताच्या किनारपट्टीवर म्हणजे चोल कल्याण, सोपारा इत्यादी ठिकाणी अरब लोकांची वस्ती होती. सातव्या शतकात इस्लामच्या उदयानंतर अरब जगताच्या सैन्याने मध्य आणि पश्चिमी आशियाच्या भागावर अधिकार प्रस्थापित केले होते.[१] व अरब राष्ट्रांतील जहाजे हिंदी महासागरात संचार करू लागली. तांबड्या समुद्राकडून ते सिंधू नदीच्या मुखाशी व खंबायतच्या आखातातुन मलबार येथे त्यांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले हजारोंच्या संख्येने ते मलबार येथे स्थायिक झाले व हेच पुढे मोपला जमात म्हणून प्रसिद्धीस आले.

सुरुवातीच्या अरबांचा मुख्य व्यवसाय व्यापार आहे. यामुळे त्यांचे संबंध भारत, श्रीलंका, मलाया, इंडोनेशिया, इजिप्त, ग्रीक, आफ्रिका, युरोपियन इत्यादी राष्ट्रांशी होते. इस्लाम धर्माचा उदय झाल्याने या धर्माने अरबांना नवचैतन्य, उत्साह व शक्ती दिली मोहम्मद पैगंबराच्या स्वर्गवासानंतर इस्लाम धर्माचा प्रसार व प्रचार करण्याची मोठी जबाबदारी त्यांची अनुयायांवर पडली व या धर्माच्या प्रसार व प्रचार करण्यासाठी अरब लोक मोठ्या प्रमाणात बाहेर पडले. असे म्हटले जाते की, इस्लामच्या प्रसारासाठी हजरत मोहम्मदच्या काळातच त्यांचा एक साथीदार (सोबती) भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर रत्नागिरीजवळ आला होता.[२] तेथे त्याची समाधी आहे.

डॉ. डी.टी.एन. देवरे यांच्या मते ''भारत वर्षाची पश्चिम समुद्र किनारपट्टी व्यापारासाठी विद्वान आणि शांतीप्रिय संततीसाठी खुली होती व ते सुरत भडोच-दाभोळ ठाणे इत्यादी बंदरावरून दक्षिणेकडे मार्गक्रमण करत.''[३]

१६ व्या शतकातील इतिहासकार फेरिस्ता म्हणते की, 'भारताकडे प्रथम मुस्लिमांची एक टोळी (यात्री) आली होती. ते श्रीलंकेतील आदम (प्रथम प्रेषित) च्या पदचिन्हाचे दर्शन करण्यासाठी आले. या तुकडीचा प्रमुख शेख राऊफ बिन मलिक होता. यावरून असे दिसते की, धर्म प्रचाराच्या उद्देशाने भारतात मुसलमान फार पूर्वीपासून येत होते.[४] दक्षिण भारतात अरब व्यापारी प्राचीन

काळापासुन आपला व्यापार करीत होते. राजा नमोरनचा व्यापार अरबांशी मोठ्या प्रमाणावर चालत असे.

श्री. सेतु माधवराव पगडी 'सुफी संप्रदाय' या आपल्या ग्रंथात लिहीतात की, भारत वर्षात मुसलमानांचे आगमन इस्लाम धर्मस्थापनेच्या ५० वर्षांनंतर झाले होते. मात्र अरब व्यापाऱ्यांचा संबंध हिंदुस्थानातील मलबार आणि कोकणशी प्राचीन काळापासून होता. ७ व्या शतकापासून काही मुस्लिम कुटुंबे कोकण-मलबार येथे स्थायिक होती. जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यात डोणगावात हजरत नुरूद्दीन यांची दर्गा आहे. हजरत नुरूद्दीन ७ व्या शतकात औरंगाबाद येथे आले होते.[५]

राजकीयदृष्ट्या भारतावर मुस्लिमांचे आक्रमण किंवा प्रवेश इ.स. ७१२ मध्ये झाले. इमामुद्दीन मुहम्मद बिन कासीमने सिंध प्रांतावर आक्रमण केले. दमिश्क बनी उमैय्याची राजधानीतील खलिफा वलीदचे बसऱ्यातील गव्हर्नर हुज्जाज याने आपला पुतण्या मुहम्मद बिन कासीम यास सिंध प्रांताचे राजे दाहीरवर हल्ला करून त्यास पराभव स्वीकारण्यास लावले व संपूर्ण सिंध पंजाब बलुचिस्तान आणि यण्य प्रांतावर खलिफाची सत्ता प्रस्थापित झाली. यामुळेच उत्तर-पश्चिम भागात मुस्लिमांच्या बस्त्या वाढत गेल्या.

अरब सत्तेच्या ऱ्हासानंतर खैबर खिंडीतून आणि बोलान खोऱ्यातून तुर्क आणि अफगाणी पठाणांनी भारतात प्रवेश केला. मध्य आशिया आणि अफगाणी सुलतान यांनी भारतात मुल्तानपर्यंतच्या भूमीवर आपला अधिकार जमविला. सुलतान सुबक्तगीनच्या मृत्यूनंतर इ.स. ९९९ ते १०३० पर्यंत महेमूद गजनवीने भारतावर १७ स्वाऱ्या केल्या, त्याने वायव्य प्रांतावर आपले अधिकार कायम ठेवले. गजनवी सत्तेच्या पतनानंतर अफगाणच्या गौरचा सुलतान मुहम्मद गौरीने इ.स. ११९२ मध्ये पृथ्वीराज चौहान या राजपूत राजाचा पराभव करून उत्तर-पश्चिम क्षेत्रात आपली सत्ता प्रस्थापित केली.[६] इ.स. ११९४ मध्ये कनोजचा राजा जयचंदचा पराभव करून त्याचे राज्य आपल्या राज्यात विलीन करून घेतले.

अशा प्रकारे मुस्लिम राजवटीच्या सीमा विस्तारत गेल्या व मुस्लिम शासकांनी सत्तेवर आपली मजबूत पकड जमविली. या शासकांबरोबर फकीर, सूफी, धर्मपंडित भारतात येत गेले व यांनी आपल्या आचरणांने इस्लामचा प्रसार केला.

राजकीय, व्यापार व धर्मप्रसार या कारणांसाठी इसवी सनाच्या ७ व्या शतकापासूनच मुस्लिमांचे संबंध भारतीय लोकांशी आले होते. हळूहळू राजकीय वर्चस्व निर्माण करीत संपूर्ण उत्तर भारतावर आपला एकछत्री अंमल प्रस्थापित केल्यानंतर दक्षिण भारताकडे मुस्लिमांचे कोणत्याना कोणत्या कारणासाठी संबंध येतच होते. दक्षिणेत मुस्लिमांचे राजकीय वर्चस्व प्रस्थापित होण्यापूर्वी म्हणजे इसवी सनाच्या तेराव्या (१३ व्या) शतकापासून मुस्लिम सूफी संत दक्षिणेत संचार करू लागले होते. मराठवाड्यातील जालना जिल्ह्यातील डोणगांव येथील 'हजरत सय्यद नुरूद्दीनचा' संबंध तर इसवी सनाच्या ९ व्या शतकापासून लावला जातो. या दर्ग्यावर बोहरा जमातीची निष्ठा आहे. नुरूद्दीनच्या संदर्भात असे सांगता येईल की हा इजिप्त देशाचा राहणारा असून इसवी सनाच्या ९ व्या शतकात तो इजिप्तहून निघून हिंदुस्थानात आला व पहिल्या प्रथम राक्षसभुवन येथे

गोदावरीच्या काठी स्थायिक झाला.[७] व नंतरच्या काळात तो जालना जिल्ह्यातील डोणगाव येथे स्थायिक झाला. येथेच त्यांचा मृत्यू झाला. तद्नंतर खुलताबाद दौलताबाद येथे अनुक्रमे हजरत जलालुद्दीन गंजे रवॉ, हजरत मोमीन आरेफ बिल्ला यांच्या समाध्या आहे. मोमीन अरिफ यांचा काळ तेराव्या शतकाचा पूर्वार्ध समजला जातो. अर्थातच यादवांच्या राजवटीत या सूफींचे देवगिरीस आगमन झाले म्हणजेच या संताबरोबर अनेक मुस्लिमांचा प्रवेश मराठवाड्यात झाला.[८] एक प्रकारे इस्लामचा प्रवेश, प्रसार या माध्यमातून झाला असे म्हणता येईल.

इ.स. १२९४ मध्ये सुलतान जलालुद्दीन खिलजीचा पुतण्या अल्लाउद्दीनने दक्षिणेत यादवांच्या राज्यावर अचानक हल्ला करून देवगिरीचे राज्य खिळखिळे करून टाकले.[९] या दरम्यान दिल्ली येथे हजरत शेख निझामोद्दीन यांनी सूफी संतांच्या बैठकीत दक्षिणेत धर्मप्रसारासाठी सूफी संतांना पाठविण्याचा निर्णय घेतला व हजरत मुन्तजीबोद्दीन जर जरी बक्क्ष यांना सातशे सहकाऱ्यांसह इ.स. १३०० मध्ये दक्षिणेत पाठविले ते आपल्या सर्व सहकार्यांसह रौजा खुलताबाद येथे स्थायिक झाले.

हजरत मुन्ताजीबोद्दीन यांनी आपल्या शिष्यांना दक्षिणेत विशेषतः मराठवाड्यात निरनिराळ्या ठिकाणी धर्मप्रचारार्थ पाठविले. या सूफी फकिराची मोहीम मराठवाड्यात परिणामकारक ठरली. पैठणचे शहा मोईजोद्दीन ऊर्फ मौलाना साहब, गंगापूर येथील नानपाश मोईजोद्दीन, वैजापूरचे गाजी रूकनुद्दीन, उदगीरचे स. सदरुद्दीन इत्यादी सर्व मंडळी ही मुन्तजीबोद्दीन बरोबर दिल्लीहून आली होती असे दिसून येते. या सर्व संत मंडळीने आपल्या आचरणाने विचारसरणीने मोठ्या प्रमाणात इस्लामचा प्रसार प्रचार केला. आपल्या विचाराला (तत्त्वज्ञान) लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी १३ व्या शतकात खानकाह स्थापन केल्या. यातून धर्मप्रचार, सूफी तत्त्वज्ञानाचा प्रसार होऊ लागला. मराठवाड्यात सूफी संतांची केंद्रे म्हणून औरंगाबाद, खुलताबाद, बीड, परभणी, बुऱ्हाणपूर इत्यादी प्रसिद्ध शहरे आहेत. यामुळे मराठवाड्यातील जनता इस्लाम धर्माकडे आकर्षिली व इस्लाम धर्मासाठी पोषक वातावरण निर्माण झाले.

निष्कर्ष :

१) प्राचीन काळापासून भारताचे अरब राष्ट्राशी व्यापारी संबंध आले आहे.
२) इसवी सनाच्या सहाव्या शतकात मुहम्मद पैगंबर यांनी इस्लाम धर्माची स्थापना केली.
३) इस्लाम धर्माच्या प्रसार व प्रचारासाठी इस्लामचे अनुयायी भारतात आले.
४) सूफी संतानी आपल्या विचाराचा प्रसार भारत भूमीवर केला.
५) सुल्तान अल्लाउद्दीन खिलजी प महमंद बिन तुघलकाने आपले राजकिय वर्चस्व मराठवाडा व इतर भागावर निर्माण केले.
६) महंमद बिन तुघलकाने राजधानी म्हणून देवगिरीची निवड केली.

संदर्भ :

१) डॉ. एजाज शेख, 'सूफी संप्रदाय' (तत्त्वज्ञानः धार्मिक व सामाजिक), चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २००९, पृ.क्र. २९.

२) कित्ता, पृष्ठ ३०.

३) निकल हसन आर.ए., 'इस्लाम के सूफी साधक अनु. नरेश्वर', चतुर्वेदी मित्र प्रा.लि., इलाहाबाद, १९८८, पृ.क्र. १८.

४) व्ही.डी. महाजन, 'मध्य कालीन भारत', एस. चन्द प्रकाशन, नई दिल्ली, २००३, पृ.क्र. १३

५) निशिकांत ठकार (संपा.) 'समग्र सेतुमाधवराव पगडी', खंड - ४, कै. सेतुमाधवराव पगडी समग्र प्रकाशित साहित्य मराठी साहित्य परिषद हैदराबाद, २०१०, पृ.क्र.१६.

६) मेहता जे.एल. 'मध्यकालीन भारत का बृहत इतिहास', (खंड-१), जवाहर पब्लिकेशन, नई दिल्ली, २००३, पृ.क्र. ६१-६५.

७) उपरोक्त, डॉ. एजाज शेख, पृ.क्र. २८०.

८) उपरोक्त, प्रा. निशिकांत ठकार, पृ.क्र. ३८.

९) प्रल्हाद जी. लुलेकर, सतीश बडवे (संपा.), 'मराठवाड्यातील साहित्य', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २००७, पृ.क्र. ३०.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com